RNI No. MAHBIL/2009/31748

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ—मध्य उप-विभाग

वर्ष ७, अंक ४६] मंगळवार, नोव्हेंबर ९, २०२१/कार्तिक १८, शके १९४३ [ पृष्ठ १, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ७२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपरिषदा, प्राथमिक शिक्षण आणि स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम यांखालील (भाग चार-ब मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आदेश व अधिसूचना यांव्यतिरिक्त) आदेश व अधिसूचना.**

**राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र**

नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१

**माहे डिसेंबर, २०२१ ते जानेवारी, २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकांसाठी दिनांक १ नोव्हेंबर २०२१ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी गाह्य धरण्याबाबत.**

**आदेश**

क्रमांक रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र. १/का. ८.—मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम १९(१)(ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र. ५९) मधील कलम ७(अ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १२ चे पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, दिनांक १ नोव्हेंबर २०२१ या दिवशी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, माहे डिसेंबर, २०२१ ते जानेवारी, २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक / पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**किरण कुरुंदकर,**
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.



ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.